# मेट्रो-३ भुयारी मार्ग महालक्ष्मीपर्यंत पोहोचला

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गावरील महालक्ष्मी मेट्रो स्थानकावर भुयारीकरणाचा ३९ वा टप्पा आज यशस्वीरित्या पार पडला. सायन्स म्युझियम मेट्रो स्थानक ते महालक्ष्मी मेट्रो स्थानक हा अप-लाईन मार्गाचा ११९७.५ मी. भुयारीकरणाचा टप्पा २५७ दिवसात पूर्ण करण्यात आला. मेट्रो-३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ५२.६ की.मि. म्हणजेच ९६.टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी स्थानक दरम्यान भुयारीकरण आव्हानात्मक होते. ८० वर्षापेक्षा जास्त जुन्या इमारतींच्या आणि पश्चिम रेल्वेच्या महालक्ष्मी आणि लोअर परळ स्थानकांच्या दरम्यान थेट रेल्वेमार्गाच्या खालून या टप्प्यातील भुयारीकरण करण्यात आले आहे.